# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

(नोटीस)

स्थायी समितीची सभा सोमवार दिनांक १४/०१/२०१९ रोजी दुपारी १२.०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती, स्थायी समिती सभागृहात मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता भरणार आहे.

नागपूर
दिनांकः— १०/०१/२०१९

आदेशान्वये,

हस्ता/—

(हरीश नवलकिशोर दुबे)
निगम सचिव
महानगरपालिका, नागपूर

## मागील विचाराधिन विषय
(दि. 02.01.2019)

विषय क्रमांक 463ः— {सा.प्र.वि.} नागपूर मनपातील मा. पदाधिकारी व अधिका—यांना कार्यालयीन कामाकरीता चार चाकी वाहाने (Hatch Back, Sedan, Eeco) पुढील दोन (सन 2018—2019 ते 2019—2020) वर्षाकरिता भाडेतत्वावर घेउन उपलब्ध करण्यास्तव नविन दर करार निश्चीत करण्याकरीता खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

1) Hatch Back वाहनांकरीता रू. 24,000/— व Sedan वाहनांकरीता रू. 28,000/— पेक्षा कमी निविदा दर सादर करणा—या निविदाधारकांकडून त्यांनी सादर केलेल्या दराप्रमाणे व अतिरिक्त तासाकरिता रू 100/— प्रति तास व अतिरिक्त किलोमीटर करिता रू 10/— प्रति किलोमीटर प्रमाणे सेवा घेणेस मंजूरी देणे.

2) Hatch Back वाहनांकरीता रू. 24,000/— पेक्षा जास्त व Sedan वाहनांकरीता रू. 28,000/— पेक्षा जास्त निविदा दर सादर करणा—या निविदाकारांतुन वाटाघाटी करून Hatch Back व Sedan वाहनांकरीता अनुक्रमे रू. 24,000/— व रू. 28,000/— या दरावर काम करणेस सहमत असणा—या निविदाधारकांच्या व अतिरिक्त तासाकरिता रू 100/— प्रति तास व अतिरिक्त किलोमीटर करिता रू 10/— प्रति किलोमीटर प्रमाणे सेवा घेणेस मंजूरी देणे.

उक्तप्रमाणे Sedan वाहनांचे निविदाधारक जास्त असल्याने दराशी सहमत असणा—या निविदाधारकांच्या वाहनांचे नोंदणी तारखेप्रमाणे नविन वाहनांना प्राधान्य देण्यात येवून उर्वरीत वाहने प्रतिक्षा यादीत ठेवण्यात येवून पुढील आवश्यकतेनूसार त्यांना घेण्यात येईल.

3) Eeco वाहनाचे प्रकारात पूर्वीच्या मारूती व्हॅन या वाहनाकरीता रू. 18,000/— प्रतिमाह दर निश्चित असून नविन निविदेत मारूती व्हॅन हे वाहन नसून Eeco या वाहनाकरीता निम्नतम (L1) दर रू. 26,000/— प्राप्त झालेले आहेत. व याच दरावर उर्वरीत 06 निविदाधारकांनी काम करण्याची तयारी दर्शविली आहे. या वाहनांची रू. 26,000/— दरात व अतिरिक्त तासाकरिता रू 100/— प्रति तास व अतिरिक्त किलोमीटर करिता रू 10/— प्रति किलोमीटर प्रमाणे सेवा घेणेस मंजुरी देणे.

याकामास वार्षिक खर्च रू. 235/— लक्ष अपेक्षीत आहे. हा खर्च पद क्र. A20100121805/42 मधून करण्यात येईल.

वरिल प्रस्तावास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप — विस्तृत टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

## नवीन विषय

विषय क्रमांक 536 :— प्रभाग क्र. 22 ड येथे रामपेठ परिसर मध्ये लिला स्टील ते विजन क्लास
{लोककर्म झोन 6} आणि उमिया शंकर शाळे पर्यंत सिमेंट कॉक्रींट रस्त्याचे बांधकामास्तव प्राप्त मे. अमित कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनिय दरापेक्षा ६.२८ टक्के कमी दरांची रू.२४,५४,५२१/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :

१. या कामाचा खर्च पद क्र. A40200470202 अंतर्गत प्रस्तावित असून या कामास स्थायी समिती ठराव क्र. ४७२ दि.९.२.२०१८ अन्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.
२. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 537 :— प्रभाग क्र. २३—ब, शास्त्रीनगर येथे श्री. प्रधान, श्री. चवरे, व श्री.
{लोककर्म झोन 08} देवीकर यांच्या घरामागे तुटलेल्या नाला भिंतीचे बांधकाम करण्यास्तव रू. २८,०४,७१५/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए ४३९०१३७०८१२ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, यांचे पत्र क्र. ६७५/टी. आर. /सी. एस. सी./ प्रोव्हिजन दिनांक ०१/०९/२०१८ अन्वये विस्तृत प्राकलन तयार करून सादर करण्याचे निर्देश प्राप्त असुन प्रस्तुत कामाकरीता आर्थिक वर्ष २०१८—१९ चे आय—व्ययकातील पद क्र. ए. ४३९०१३७०८१२ रू. २८,०४,७१५/— राशीची तरतुद मुक्त करण्यात आलेली आहे.
2. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.
3. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 538 :— मौजा—नागपूर येथील खसरा क्र. 358/3 मधील नगर भुमापन
{स्थावर विभाग} क्र. 104 मधील शासनाचे मुळ मालकीतील व महानगरपालिकेच्या व्यवस्थापनाखालील 2149.00 चौ.फुट जागा नागपूर मेहतर विविध उद्देशिय सहकारी संस्था, मर्यादित यांना शैक्षणिक वापराचे उपयोगाकरीता आवंटीत करण्यास शासनास ना—हरकत प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१. मौजा—नागपूर येथील खसरा क्र. 358/3 मधील नगर भुमापन क्र. 104 मधील 6000.00 चौ.फुट जागा मनपा ठराव क्र. 139 दि. 29.02.2000 अन्वये शासनास जागा हस्तांतरीत करण्यास मंजुरी प्रदान आहे.
२. मौजा—नागपूर येथील खसरा क्र. 358/3 मधील नगर भुमापन क्र. 104 मधील 2149.00 चौ.फुट जागा ही हस्तांतरीत केलेल्या 6000.00 चौ.फुट जागेच्या मागील बाजुस लगतची जागा आहे.
३. जागेची मुळ मालकी शासनाची असल्यामुळे जागा शासनाकडुन संबंधित संस्थेस हस्तांतरीत करावयाची आहे. तथापि जागा मनपा व्यवस्थापनाखालील असल्यामुळे शासनास ना—हरकत कळविणे आवश्यक आहे.

विषय क्रमांक 539 :— प्रभाग १५ क सेंट्रल मॉल, रामदासपेठ समोरील नाग नदीवर
{लोककर्म झोन 02} असलेल्या पूलाचे गनायटिंग व ग्राउटिंग द्वारे मजबुतीकरण करणे या कामाकरीता दुसया वेळेस प्राप्त झालेली मे.एस.पी. भावे यांची एकमेव निविदा,प्राकलनिय राशी रू. ५९,००,२००/— पेक्षा ४.९५ प्रतिशतने जास्त म्हणजे रू. ६१,९२,२६०/— आहे. निविदाकाराने १ प्रतिशत दर कमी करण्यास म्हणजे प्राकलनिय राशी पेक्षा ३.९५ प्रतिशत जास्त दरावर रू. (६१,३३,२५८/—) काम करण्यास सहमती दिलेली आहे. निम्नतम निविदा मंजुर करण्याचा प्रश्न विचारात घेणे

टिप :— 1) कामाचा खर्च आय व्यय पद क्र. A42101370616 अंतर्गत करण्यात येईल.
2) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 540 :— प्रभाग क्र. 26 — क अंतर्गत मौजा वाठोडा खसरा क्र. 55/3 कैलाश
{लोककर्म झोन 5} गृह निर्माण सह. संस्था श्रीकृष्ण नगर येथे श्री कोंगे ते श्री यरपुडे ज्वेलर्स यांचे घरापर्यंत रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण तसेच मौजा वाठोडा खसरा क्र. 52/1 श्रीकृष्ण गृह निर्माण सह. संस्था येथील कनोजे ते गुरूदेवधाम येथील फुटपाथचे बांधकाम करण्याचे कामास्तव रूपये 36,78,670/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. मा. अध्यक्ष स्थायी समिती, यांचे पत्र क्र. 342/ टी आर /सी एस सी/ प्रोव्हिजन दि. 04/08/2018 अन्वये 2018—19 च्या आर्थिक वर्षात पद क्र. A42001374612 (ना.सु.प्र. तर्फे हस्तांतरीत 572 व 1900 अभिन्यासातील कामे ) अंतर्गत रू. 36,78,670/— (छत्तीस लक्ष अठठायात्तर हजार सहाशे सत्तर फक्त ) राशीची तरतुद मुक्त करण्यात आली आहे.
2. प्रस्तुत कामाची प्राकलनिय राशी रू. 32,83,556/— ला तांत्रीक मान्यता प्राप्त आहे.
3. विस्तृत माहिती नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 541 :— प्रभाग क्र. ११ ड मधील गोरेवाडा घाटात उर्वरीत विविध स्थापत्य
{लोककर्म झोन 10} कामे करण्यास्तव रू. ३४,८९,४५५/— (चौतीस लक्ष अठ्ठयान्नव हजार चारशे पचपन रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A43501271705 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:—

१)मा. सभापती स्थायी समिती यांनी पत्र क्र. १०१७/TR/CSC Provision दि. २७.०९.२०१८ नुसार या कामास रू. ३४,८९,४५५/— रक्कमेचे प्रावधान पद क्र. A43501271705 मधून उपलब्ध करून दिलेले आहे.

२)या कामास्तव रू. ३१,१६,८१७/— रक्कमेच्या प्राकलनास मा. अधिक्षक अभियंता यांनी Vide /T.S. No 248/SE/PWD/2018-2019 दि. १५.१२.२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

३) सविस्तर टिप्पणी नस्तीत सलग्न.

विषय क्रमांक 542 :— प्रभाग क्र १ ड अंतर्गत दयानंद पार्क ते शिव मंदीर (साई झुलेलाल
{लोककर्म झोन 10} मार्ग) रोडचे सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकामास्तव रू. ४९,८०,०४३/— (एकोणपन्नास लक्ष अंशी हजार तीळेचाळीस रूपये फक्त ) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:—

१)मा. सभापती स्थायी समिती यांनी पत्र क्र. २४/TR/CSC Provision दि. २३.०७.२०१८ नुसार या कामास रू. ४९,८०,०४३/— रक्कमेचे प्रावधान पद क्र. A42001470511 मधून उपलब्ध करून दिलेले आहे.

२)या कामास्तव रू. ४४,४७,८५९/— रक्कमेच्या प्राकलनास मा. अधिक्षक अभियंता यांनी Vide /T.S. No SE/PWD/T.S./185/2018-2019 दि. १२.१०.२०१८ अन्वये तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

३) सविस्तर टिप्पणी नस्तीत सलग्न.

विषय क्रमांक 543 :— प्रभाग क्र. २ ब अंतर्गत रमाई नगर येथे सिमेंट रोडचे बांधकाम
{लोककर्म झोन 09} करण्याच्या प्राकलनीय रक्कम रु. ३२,१४,९०७/— च्या व निविदा किंमत रु. २८,४२,०३२/— च्या कामाकरिता प्राप्त तीन निविदांपैकी, मे. हितेश कंनस्ट्रक्शन यांची, निविदा किंमती पेक्षा १.५२ टक्के कमी दराच्या रू. २७,९८,६९१/— च्या निम्नतम निविदेस तथा त्यावरील १२ टक्के जी.एस.टी व १ टक्का चाचणी शुल्क इत्यादी सह एकूण रु. ३१,६२,५२१/— च्या कार्यराशीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) या कामाचा खर्च पद क्र.६७९(A४२००१४७०५११)अंतर्गत प्रस्तावित असुन या कामास प्रशासकिय मान्यता प्राप्त आहे.

२) सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 544 :— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 17, क अंतर्गत विश्वकर्मा नगर येथील गल्ली नं. 8 येथे श्री. धाबर्डे यांचे घरापासुन ते श्री. चौधरी तसेच धाबर्डे ते दुबे यांचे घरापर्यंत सी.सी. रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 3297374/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (ए2201330803) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांचे पत्र क्र. 678/टी.आर./सी.एस.सी./प्रोव्हिजन दि. 01.09.2018 अन्वये विस्तृत प्राकलन तयार करुन सादर करण्याचे निर्देश प्राप्त आहे.
2. प्रस्तुत कामाकरिता सन 2018—2019 चे आय व्ययकातील पद क्र. 681 (ए22001330803) अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.
3. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.
4. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 545 :— {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 36 (ड) पांडे लेआऊट येथील उद्यान विविध कामे करण्याकरीता रू 39,10,490/— रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 552/दि. 27/02/2018 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामांच्या काम निहाय निविदा मागविल्या असता प्राप्त निविदे पैकी सर्वात कमी दराच्या निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/जास्त दर | निविदा राषी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. बाबा इंन्टरप्राईजेस | 14.90% कमी | रू. 2304704/— |
| 2 | हिरवळीची कामे | मे. विदर्भ एन्व्हारोमेंटल सर्व्हिसेस | 0.98% कमी | रू. 992438/— |
| | | | एकूण रू : | रू. 32,97,142/— |

प्राप्त वरिल प्रमाणे एकत्रित राशी रू 32,97,142/—च्या निम्मतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

विषय क्रमांक 546:— {कार्य अभि जलप्रदाय} नागपूर शहरात टॅंकरद्वारे पिण्याचा पाण्याचा पुरवठा व वितरण करण्याकरीता खालील नमूद प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

नागपूर शहरात टॅंकरद्वारे पिण्याचा पाण्याचा पुरवठा व वितरण करण्याकरीता दि. 27.06.2016 अन्वये बोलविण्यात आलेल्या निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 596, दि. 17.10.2016 अन्वये मंजूरी प्राप्त आहे. सदर निविदेचा कालावधी दि. 31.10.2018 ला संपुष्टात आलेला असल्याने सदर निविदेस 3 महिने म्हणजे दि. 31.01.2019 पर्यंत मुदतवाढीस जुन्या मंजूर दरावर मंजुरी प्रदान करणे. .

टिप :-

1. या कामाचा खर्च पद क्र. 416 अंतर्गत प्रस्तावित आहे.
2. जुने दर स्थायी समिती ठराव क्र. 67, दि. 16.04.2018 अन्वये मंजूर असून ते पुढीलप्रमाणे आहेत.
   अ. 2000 लीटर - रू. 328/- प्रति फेरी.
   ब. 3000 लीटर - रू. 358/- प्रति फेरी.
   क. 4000 लीटर - रू. 386/- प्रति फेरी.
   ड. 6000 लीटर - रू. 424/- प्रति फेरी.
3. सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 547 :— प्रभाग क्र. ०४—क, अंतर्गत भरतवाडा गावातील भरतवाडा घाटाचा
{लोककर्म झोन 08} विकास करण्यास्तव रू. २९,६८,२३३/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच पद क्र. ए ४३५०१२७१७०५ मधून तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. मा. अध्यक्ष, स्थायी समिती, यांचे पत्र क्र. १२७३/टी. आर. /सी. एस. सी./ प्रोव्हिजन दिनांक ११/१२/२०१८ अन्वये विस्तृत प्राकलन तयार करून सादर करण्याचे निर्देश प्राप्त असुन प्रस्तुत कामाकरीता आर्थिक वर्ष २०१८—१९ चे आय—व्ययकातील पद क्र. ए. ४३५०१२७१७०५ रू. २९,६८,२३३/— राशीची तरतुद मुक्त करण्यात आलेली आहे.
2. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.
3. विस्तृत टिपणी नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 548 :— प्रभाग क्र. 2—ड येथील नारी घाट जवळ पिवळया नदीवर नविन पुलाचे
{लोककर्म झोन 09} बांधकाम करण्याच्या कामास्तव चार वेळा निविदा बोलविण्यात आल्या असता एकमेव निविदाकाराने मे. कुमार बिल्डर्स, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा 20.11% टक्के जास्त दराची निविदा सादर केलेली असता निविदाकारा सोबत वाटाघाटी करून 18.11% टक्के अधिक दरावर असलेली रूपये 3,36,12,265/— (रूपये तिन कोटी, छत्तीस लक्ष, बारा हजार दोनशे पासष्ठ फक्त) ची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

या कामाचा खर्च पद क्र. A42101370616 अंतर्गत करण्यात येईल.

टिप :

1. या कामाचा खर्च पद क्र. A42101370616 अंतर्गत प्रस्तावित आहे.
2. सदर्हु कामास चौथ्यांदा निविदा बोलविण्यात आली असता एकुण 01 निविदा प्राप्त झाल्यात.
3. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 549:— नागपूर महानगरपालिका द्वारा सरदार वल्लभभाई पटेल मैदान
{क्रीडा व सांस्कृ विभाग} (कच्छीविसा) लकडगंज, येथे श्री. साईबाबा समाधी सोहळया निमित्त 250 कलाकारांचा समावेश असलेले ''शिर्डी के साईबाबा'' महानाटय मे. संस्कार मल्टी सर्व्हिसेस या संस्थेमार्फत आयोजित करण्यात येणार असून या महानाटयाच्या सादरीकरणाकरिता येणारा संपूर्ण खर्च रु. 11 लक्ष मानधन या संस्था नावे द्यावे लागेल. याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 5(2) (2) नुसार स्थायी समितीची निर्णयास्तव तसेच ''शिर्डी के साईबाबा'' महानाटय आयोजित करण्यास तथा त्याला येणारा रु. 11 लक्ष मे. संस्कार मल्टी सर्व्हिसेस नावे पद क्र. ए26502242213 मधून भुगतान करण्याचा प्रश्न विचारात घेण्यास्तव प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर.

विषय क्रमांक 550:— जकातीच्या जप्तीच्या मालाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने
{स्थानिक संस्था कर} ई—लिलाव व्दारे विक्री करणेबाबत.

जकातीच्या जप्तीच्या मालाची विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने निविदा मागवून विक्री करण्याबाबतच्या प्रस्तावास यापूर्वी मा. स्थायी समिती ठराव क्र. २५ दिनांक २९.०४.२०१७ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आलेली होती (नस्तीत पान क्र.४८ वर ठराव प्रत संलग्न आहे). त्यानुसार विभागाव्दारे ई—निविदा मागविण्यात आलेली होती. जकातीचा जप्ती केलेला माल हा बराच जूना असून सदर्हू निविदेस तीनवेळा मुदतवाढ देवूनही दोनच निविदाकारांनी यात भाग घेतलेला होता. तसेच विभागाने प्रस्तावित केलेल्या किंमतीपेक्षा निविदाकारांनी फारच कमी किंमत सादर केलेली होती. त्यानुसार विभागाव्दारे मालाची ३० प्रतिशत किंमत कमी करुन फेर निविदा मागविण्याचे प्रस्तावित करुन स्थायी समिती ठराव क्र.५७५ दिनांक २७.०२.२०१८ चे मंजूरी अन्वये फेर निविदा मागविण्यात आली होती. सदर्हू ११ लॉट मालाच्या एकूण रु.३५,१६,९९८/— प्राकलनीय राशीच्या ३४ टक्के कमी रु.११,८४,७०१/— दराच्या निविदा प्राप्त झाल्याने तत्कालीन मा. आयुक्तांनी ई—लिलाव ची प्रक्रिया राबविण्याचे आदेश प्रदान केल्याने दिनांक ११.०९.२०१८ ला ई—लिलावाची प्रक्रिया करण्यात आली होती. परंतु सदर्हू ई—लिलावात देखील एकाही बिडरने भाग घेतलेला नाही. ई—लिलाव प्रक्रिया राबवितांनी ब—याच इच्छुक व्यक्तीनी मालाची प्रत्यक्ष

पाहणी केली होती. परंतु त्यांनी माल पाहत असतांना मालाची प्रत्येक लॉट ची किंमत ही बरीच जास्त असल्याचे व हा माल सध्या स्थितीत कालबाहय (out dated) झालेला असल्याचे सांगितले व त्यांनी ई—लिलाव प्रक्रियेस प्रतिसाद दिला नाही.

संबंधीत जकातीचा जप्तीचा माल हा बराच जूना असून वाडी नाक्यावरील मालाचे सुरक्षे करीता नियुक्त सुरक्षा रक्षकांवर देखील खर्च होत असल्याने सदहू मालाची खालील प्रमाणे पुन:श्च ३०% किंमत कमी करुन फेर ई—लिलाव मागविण्याकरीता मा.स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेण्याची विनंती आहे.

30% Less of Estimated Cost

| Lot No. | विक्री करण्यात येत असलेल्या मालाचे वर्णन | Estimated Cost | 30% Less Round up |
|---|---|---|---|
| १. | Sports Goods | 52710.00 | 36900.00 |
| २. | Medical/surgical/scientific | 78429.00 | 54900.00 |
| ३. | Maniyari | 193004.00 | 135100.00 |
| ४. | General Goods/Cosmetics | 560556.00 | 392400.00 |
| ५. | Electrical goods | 503435.00 | 352400.00 |
| ६. | Electronic goods | 377786.00 | 264500.00 |
| ७. | Kitchenware goods | 301367.00 | 211000.00 |
| ८. | Ready-mades | 233093.00 | 163200.00 |
| ९. | Industrial/Engineering | 130116.00 | 91100.00 |
| १०. | Hardware/ Sanitary | 488936.00 | 342300.00 |
| ११. | Motor/Auto Parts | 597566.00 | 418300.00 |
| Total | | 3516998 | 2462100 |

टिप :— सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 551 :— {लोककर्म झोन 08} महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत प्रभाग क्रं. २४ भारत नगर इंडस्ट्रियल एरिया येथे रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव निविदा मागविली असता एकुण प्राप्त दोन (२) निविदापैकी मे. अमृता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा १०.०१ टक्के कमी दराची रू. ९३,०५,९७३/— रकमेची निम्नतम निविदा आहे. करिता रू. ९३,०५,९७३/— + GST १२ टक्के रू. ११,१६,७१७/— + Testing Charges रू. ४२,८५०/— असे एकुण रू. १,०४,६५,५४०/— रकमेचा कार्यादेश निर्गमीत करण्यात मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे. हा खर्च पद क्रं. A४२००१३६०९०५ मधुन करण्यात येईल.

टिप :—

१. प्रस्तुत कामाकरीता क्रं. डेस्क १२/एमयुएन ३/कावि—१२४०/प्रमा.—२१९/२०१८ दिनांक १५.०९.२०१८ अन्वये रू. १,१६,३०,१७५/— रकमेच्या कामास प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे.

२. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 552 :— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. 12,(ड) मधील हजारीपहाड घाट फ्रेंडस् कॉलनी येथे स्थापत्य व सौंदर्यीकरणाऱ्या रु.41,36,685/— च्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण सहा निविदाकारांपैकी निम्नतम निविदाकार मे.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांच्या 14.80 प्रतिशत कमी दरांच्या रु. 33,03,702/— च्या निविदेस स्थायी समितीच्या दि. 23.03.2018 च्या ठराव क्रमांक II अन्वये मंजुरी प्राप्त आहे.

सन 2017—2018 या आर्थिक वर्षात प्रावधान उपलब्ध नसल्यामुळे व निम्नतम निविदाकार मे.एस. आर. कन्स्ट्रक्शनस् यांनी दि. 18.07.2018 च्या पत्रान्वये त्यांचे निविदा दर रद्द करण्याची विनंती केल्यामुळे कार्यादेश होऊ शकले नव्हते.

दुसऱ्या क्रमांकावरील निविदाकार मे. जानव्ही इंटरप्राईजेस यांनी यांच्या 12.80 प्रतिशत कमी या दरांऐवजी निम्नतम निविदाकार यांच्या निविदादरांवर काम करण्याची तयारी दर्शविल्यामुळे मे. जानव्ही इंटरप्राईजेस यांना 14.80 प्रतिशत कमी या दरांवर काम देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— विस्तृत माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 553 :— लष्करीबाग येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर नागपूर सुधार {स्थावर विभाग} प्रन्यासव्दारे तयार करण्यात आलेल्या "बाजीराव साखरे" वाचनालयाचे ताबा/हस्तांतरण करुन घेण्याबाबत.

वरील विषयान्वये म.न.पा. ठराव क्र. 24 दि. 21.02.2005 अन्वये लष्करीबाग, म.न.पा. शाळेच्या आवारात नागपूर सुधार प्रन्यासमार्फत वाचनालय बांधण्याकरीता प्रस्तावित इमारतीची मालकी महानगरपालिकेची राहिल या अटींवर परवानगी देण्यात आली होती. सदर जागेवर ना.सु.प्र. ने दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत वाचनालय इमारतीचे बांधकाम केले आहे. सदर इमारत महानगरपालिकेने हस्तांतरीत घेण्यासंदर्भात ग्रंथालय अधिक्षक, म.न.पा. यांनी प्रस्ताव पाठविलेला आहे. तथापि सदर इमारतीस स्थावर विभाग, म.न.पा. यांनी हस्तांतरीत करुन घेण्याअगोदर वाचनालयात फर्निचर पुस्तके, संगणक व डिजीटल सेटअप असे सर्व सुविधायुक्त इमारतीचा ताबा स्थावर विभागाने घ्यावे अशी अट प्रस्तावात दर्शविलेले आहे. तसेच सदर इमारतीचा एस.एन.डी.एल. चे विद्युत देयक बील रु. 1,34,000/— भरावयाचे आहे.

तसेच या इमारतीमध्ये खालील नमुद सामुग्री अपुरी आहेत. वाचनालय सुरु करण्यासाठी खालील बाबींचा विचार करणे गरजेचे आहे.

१. इमारतीच्या पहिल्या माळ्यावर डिजीटल लायब्ररीची खोली असुन तेथे फर्निचर आहे. परंतु डिजीटल लायब्ररीकरीता लागणारी सामुग्री कम्प्युटर, सर्वर इत्यादी उपलब्ध नाही.
२. इमारतीतीत लाकडाची आलमारी खुल्या स्थितीत असुन कव्हर्ड केलेल्या नाहीत.
३. इमारतीच्या दुसऱ्या माळांवर हॉलमध्ये व इतर ठिकाणी फर्निचर उपलब्ध नाही.
४. ना.सु.प्र. तर्फे 10.00 लाखाची पुस्तके वाचनालयाकरीता पुरविणार होते, त्याची पुर्तता अद्यापी झालेली नाही.
५. इमारतीच्या मुख्य दरवाजाच्या बाजुला भिंत तुटलेली असुन सुरक्षतेच्या दृष्टीने सदर भिंतीची दुरुस्ती करण्याची गरज आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे त्रुटी आहेत तरीही दीर्घ कालावधीपासुन ही वास्तु लोकोपयोगी होऊ शकली नाही. यास्तव नागरीकांत असलेला असंतोष विचारात घेता आहे त्या स्थितीत ईमारत ताब्यात घेण्याबाबत व ताब्यात घेतल्यानंतर आवश्यक सुविधा निर्माण करण्याबाबत बाब विचारात घेणे.

विषय क्रमांक 554 :— प्रभाग क्र. 17, क अंतर्गत अंजटा होल ते हाडके यांचे घरापर्यंत {लोककर्म झोन 04} सी.सी. रस्त्याचे बांधकाम करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 5422051/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करुन निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 682 (ए2201330803) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. मा. अध्यक्ष, स्थायी समिति यांचे पत्र क्र. 678/टी.आर./सी.एस.सी./प्रोव्हिजन दि. 01.09.2018 अन्वये विस्तृत प्राकलन तयार करुन सादर करण्याचे निर्देश प्राप्त आहे.
2. प्रस्तुत कामाकरिता सन 2018—2019 चे आय व्ययकातील पद क्र. 681 (ए22001330803) अंतर्गत खर्च प्रस्तावित आहे.
3. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.
4. सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

विषय क्रमांक 555 :— शंकर नगर येथील शाळेच्या जागेत जिजाऊ स्मृति शोध संस्थान {लोककर्म झोन 02} उभारण्या करीता व प्रकल्प तयार करण्यास्तव, प्रचलित पदध्तीनुसार मनपाच्या नामिक यादी (empanalled list) मधील मे. डिझाईन सेल चे श्री सातपुते यांना प्रकल्प तयार करण्याकरीता प्रस्ताव देण्यात आला होता.

- मनपाच्या लेखा परिपत्रक क्र. 15/39/प्रविलेअ दि. 24/01/2018 च्या परिपत्रकानुसार या कामाच्या Pre Tender Activity करीता अंदाजित प्रकल्प राशी रू. 18.70 कोटी गृहित धरून प्रकल्प राशीच्या 0.60 टक्के म्हणजे रू. 10.80 लक्ष परंतु जास्तीत जास्त सात लक्ष व Post Tender Activity करीता (18.7 x 1.2%) म्हणजे रू. 22.50 लक्ष अधिक 7.00 लक्ष असा एकुण 29.50 लक्ष खर्च अपेक्षित होता. याबाबत सरळ नियुक्तीचे अधिकार कामाचा खर्च रू. 50.00 लक्ष पेक्षा कमी असल्यामुळे मा. मुख्य अभियंता यांना स्थायी समितीच्या मंजुरीने होते.
- परिपत्रकात नमुद केल्यानुसार मा. आयुक्त यांचे दि. 11/07/2018 च्या आदेशान्वये विहित पध्दतीचा अवलंब करून सल्लागारची नियुक्ती करण्याकरीता आवेदन मागविण्यात आले होते. दि. 04/08/2018 चे पत्राद्वारे दि. 06/08/2018 ला Incharge, E-governance Cell ला पत्र देण्यात आले. व आवेदन दि. 16/08/2018 ला 3.00 वाजता उघडण्याचे प्रस्तावित होते व त्यामध्ये Right to reject any or all quotations without assigning reason thereof is reserved by NMC असे नमुद होते.
- वरील प्रक्रिया पुर्ण होण्यापुर्वीच दि. 09/08/2018 ला परिपत्रक क्र. 12 दि. 09/08/2018 च्या तांत्रिक सल्लागार यांचे परिपत्रकामध्ये नमुद केल्यानुसार मुद्दा क्र. 1 नुसार यादीतील प्रस्तावित काम करण्यास पात्र असलेल्या सर्व सल्लागाराकडुन दर पत्रके लेखी पत्राद्वारे मागविण्यात यावीत. या निर्देशानुसार एकुण सर्व पात्र सल्लागारांना पत्र देण्यात आले होते. त्यापैकी एकुण 22 सल्लागार यांनी दर पत्रके सादर केली. त्यामध्ये मे. रामटेके यांनी न्युनतम दर सादर केले असुन त्यांचे दरानुसार या कामाची अंदाजित रक्कम रू. 18.00 कोटी गृहित धरून खालील प्रमाणे खर्च अपेक्षित होता.

  श्री रामटेके चार्टड आर्किटेक्ट नुसार

- Pre Tender Activity

  18.00 cr. x 0.60 % = (0.50% below) = 0.30% = 5.40 lacs

- Post Tender Activity

  18.00 cr. x 1.20 % = (0.75% below) = 0.30% = 5.40 lacs

  Total Cost = 10.80 lacs

- M/s. Design Cell नुसार

  Pre Tender Activity

  18.00 cr. x 0.60 % = (0.025% below) = 0.585% = 10.03 lacs = 7.00 lacs Max.

  Post Tender Activity

  18.00 cr. x 1.20 % = (0.020% below) = 1.199% = 21.58 lacs

  Total Cost = 28.58 lacs

वरील बाबी लक्षात घेता निम्नतम आवेदनकार श्री रामटेके यांना त्यांचे सादर निम्नतम आवेदन दरावर Pre Tender Activity करीता कार्यादेश देण्याच्या प्रस्तावावर विचार विनिमय केल्यावर प्रकल्प सल्लागार नेमण्याचे कामाकरीता खालील प्रमाणे समिती गठित करण्यात आली.

1. सहा. संचालक, नगर रचना विभाग.
2. वास्तुविशारद श्री गुरूनाथ मोडक.
3. श्री रंभाड

या समितीचे अध्यक्षपद वास्तुविशारद श्री मोखा यांना देण्यात आले. व कार्यकारी अभियंता यांना सदस्य सचिव नेमण्यात आले. दि. 22/11/2018 चे पत्रानुसार एकुण सर्व 22 आवेदनकारांना दि. 01/12/2018 रोजी 3.00 वाजता Presentation देण्याकरीता समिती समोर बोलविण्यात आले. समिती मधील श्री अशोक मोखा व श्री रंभाड व सहा. सचालक श्री सोनारे यांचा उपस्थितीत पाच कंस्ल्टंटच्या कामाचे निरिक्षण करून त्यांना दिलेल्या गुणांचा तुलनात्मक तक्ता दि. 18/12/2018 ला तयार करण्यात

आला. अध्यक्ष श्री मोखा यांचे दि. 18/12/2018 ला अभिप्राय खालील प्रमाणे प्राप्त झाले. व त्या आधारे मे. डिझाईन सेल यांना त्यांचे दरांवर म्हणजेस 28.58 लक्ष रूपयाचे काम देण्याचा प्रस्ताव दि. 20/12/2018 रोजी विचारार्थ होता.

वरील प्रस्तावावर अनु. क्र. 1 वर नमुद केल्यानुसार दि. 11 सेप्टेंबर. 2018 चे शासन परिपत्रक (परिपत्रक नस्तीत संलग्न) व The Architect Act. 1972 No. 20 of 1972 प्रस्तावासह यावर चर्चा करण्यात आली. चर्चेत ठरल्यानुसार खालील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीचा विचारार्थ सादर.

- प्रकल्प सल्लागार यांचे नेमणुकी करीता आता पर्यंत आवेदनाद्वारे स्पर्धेद्वारे नेमणुक करण्याची पध्दतीवर पुर्नविचार करून सर्व आवेदन रद्द करण्याची शिफारस आहे.
- दि. 24/01/2018 चे परिपत्रकात नमुद केल्यानुसार में. डिझाईन सेल यांना Pre Tender Activity करीता प्रकल्पाचे किमतीचे 0.60 टक्के (7.00 लक्ष जास्तीत जास्त) व Post Tender Activity करीता प्रकल्पाचे किमतीचे 1.20 टक्के राशी देवुन म्हणजे एकुण रक्कम 28.58 लक्ष कामाची किमत अंदाजे 18.00 कोटी गृहित धरून अंदाजे एकुण रू 28.58 लक्ष देण्याचा विचारार्थ तसेच
- मंजुरी नंतर प्रथम Pre Tender Activity करीता रू. 7.00 लक्ष कामाचा कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेणे

विषय क्रमांक 556 :— {विद्युत विभाग} जनसंवाद कार्यक्रमादरम्यान प्राप्त विविध तक्रारींचे निवारण करण्याचे अनुषंगाने ज्या ठिकाणी नवीन पथदिव्यांचे खांब अथवा तत्सम कामे करणे आवश्यक असते अश्या ठिकाणी ही कामे करण्यास जी अंदाजपत्रकीय तरतूद होती ती संपुष्टात आल्यामुळे यावर तोडगा काढण्याचे दृष्टीने मा. पालकमंत्री नागपूर जिल्हा व मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशांचे अनुषंगाने झोन क. 9 मधील तिन कामांकरीता त्याचप्रमाणे यानंतरही उर्वरीत झोन्समधे अश्याच प्रकारचे काही प्रस्ताव आल्यास त्याकरीता प्रावधान उपलब्ध असण्याचे दृष्टीकोनातुन पद क. A42301770718 (जुने – 712) अंतर्गत रू. 250 लक्षची वाढ A42301770725 (जुने – 721) मधुन पुनर्विनियोजनाद्वारे करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :— 1) खर्च पद क. A42301770725 (जुने पद क. – 721) अंतर्गत प्रावधान उपलब्ध आहे.
2) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 557 :— {जलप्रदाय विभाग} कन्हान नदीत साधारणतः जुन-जुलै ते डिसेंबर या कालावधीत मुबलक पाणी असते. या कालावधीत कन्हान नदीच्या पाण्याची रोहणा गावाजवळुन उचल करुन मनपाच्या पेंच जलाशयातील पाण्याचे वहन करण्याकरिता च्या 2300 मी.मी. व्यासाच्या पाईपलाईन मधुन गोरेवाडा व गोधणी जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत वहन करण्याच्या कामाचा अभ्यास करणे व सदर कामाचा विस्तृत आराखडा तयार करणे व प्रकल्प सल्लागार म्हणुन नियुक्त करण्याकरिता विभागाच्या रु. 97,62,210/- च्या प्राकलनेस प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या व नियमीत निविदा बोलाविण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- खर्च पद क्र. A43801940701 मधुन करण्यात येईल.
विस्तृत टिप्पणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 558 :— {पेंच प्रकल्प विभाग} नागपूर शहरातील हुडकेश्वर—नरसाळा येथे पायाभूत सुविधा निर्मिती अंतर्गत राज्यशासना कडून मनपास प्राप्त झालेल्या अर्थसहाय्य, पाणी पुरवठा प्रकल्प राबविण्याकरीता व मनपा सिमे अंतर्गत ३ उंची वरील व १ जमीनीवरील जलकुंभ बांधणे याकरीता प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागाराची नेमणूक करण्याकरीता स्थायी समितीचा ठराव क्र. ४६० दि. १२/०१/२०१६ अन्वये मे.डि.आर.ए. कंन्सल्टंट लि. नागपूर (Former DRA Consultants Pvt. Ltd., Nagpur) यांच्या निम्मितम निविदेला खाली नमूद केल्याप्रमाणे मंजूरी प्रदान करण्यात आली.

१. प्रकल्प राशी वर ३ टक्के दराने निविदा म्हणजेच रू. २०६.९१ लक्ष
२. त्यावर १४.५ टक्के सेवा शुल्क रू. ०३०.०० लक्ष
एकुण रू. २३६.९१ लक्ष

स्थायी समितीच्या मंजूरी नंतर मे.डि.आर.ए कंन्सल्टंट प्रा.लि. यांना कार्यकारी अभियंता प्रकल्प मनपा यांचे पत्र क्र. NMC/PPC/EE(PPC)/299/2016 दि. ३०.०१.२०१६ अन्वये कार्यादेश देण्यात आला.

PMC च्या कंत्राटाच्या करारनाम्यातील /Request for proposal क्लॉज नं ४.२ व ४.३ नूसार PMC ला खालीलप्रमाणे भुगतान देय आहे.

i. क्लॉज नं ४.२ प्रमाणे रु. २०६.९१ लक्षा च्या, ६० टक्के २७ महिन्याच्या कालावधीत समान हफ्त्यामध्ये पेमेन्ट करावयाचे होते. व पुढील वाढीव सुध्दा याच दराने पेमेन्ट करावयाचे आहे.

ii. त्या शिवाय क्लॉज नं ४.३ प्रमाणे ४० टक्के झालेल्या कामाच्या रकमेवर (Expenditure on Capital Works) पेमेन्ट करावयाचे आहे.

उपरोक्त प्रमाणे अतिरिक्त १० महिन्याच्या कालावधी करिता क्लॉज नं ४.२ प्रमाणे प्रति माह रु. ४.५९ लक्ष, असा एकंदर रु. ४५.९० लक्ष चा अतिरिक्त निधी लागणार आहे.

या करीता उपरोक्त प्रमाणे स्थायी समिती ची मंजुरी प्राप्त झाल्यानंतर M/s DRA Pvt. Ltd. यांना रु. ४५.९० लक्ष रकमेचा अतिरिक्त कार्यादेश दयावा लागेल.

सबब M/s DRA Consultant Pvt. Ltd. यांना विभागाने ने मंजुर केलेल्या प्रमाणे प्रथम टप्यात फेब्रुवारी २०१९ पर्यत मुदतवाढ देण्यास्तव लागणारे अतिरिक्त ४५.९० लक्ष रकमेचा अतिरिक्त खर्चास मंजूरी प्रदान करुन कार्यादेश देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:—

१. सविस्तर टिप्पनी नस्तीत उपलब्ध आहे.
2. पद क्र. A४२००१३७४६०२
३. या कामाच्या रक्कमेत GST चा समावेश नाही, कारण सध्या महानगरपालिकाद्वारे करण्यात येत असलेल्या कंन्सलटंसीचे कामावर जी.एस.टी. लागु होत नाही, भविष्यात लागु झाल्यावर नियमानुसार त्यांचे अतिरिक्त भुगतान करावे लागेल. जी.एस.टी. केंद्र शासनाच्या नियमाप्रमाणे अतिरिक्त देण्यात येईल.

विषय क्रमांक 559 :— {प्रकल्प विभाग} प्रभाग क्र. ३५, नरेन्द्रनगर अंडरब्रिज ते शिल्पा सोसायटी पर्यंत नाल्याला सुरक्षा भिंत बांधणे. रूपये १०१९२४८४६/— च्या निविदा राशीचे शासकीय (मुख्यमंत्री निधी) विशेष निधी अंतर्गत करावयाचे कामास्तव निविदा मागविल्या असता, प्राप्त निविदा पैकी निम्नतम निविदाकार मे, अबरार अहमद यांची प्राकलनिय दरापेक्षा ०.०५ टक्के प्रमाणे कमी दराची रूपये १०१८७६९४१/— निविदा प्राप्त झाली आहे. या कामाची प्र. मा. रक्कम रूपये ११५६८४७००/— असुन या कामावर निविदाकाराचा देकार रूपये १०१८७६९४१/— + १२ टक्के जीएसटी रूपये १२२२५२३२/— असे एकुण रूपये ११४१०२१७३/— ची निविदा मंजुरीचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

१) सदर काम “महानगर पालिका क्षेत्रात” म.न.पा. नागपूर मुलभूत सोयी सुविधांचा विकासासाठी शासकीय निधी अंतर्गत विशेष तरतूद या योजने अंतर्गत प्रस्तावित आहे. महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्रंमाक मनपा —२०१७/प्र.क्र.१७०/नवि—१६, दि. २०/०२/२०१८.
२) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 560 :— {पिंच प्रकल्प कक्ष } मा. स्थायी समितीच्या दि. ०९.१०.२०१८ ला झालेल्या सभेत ठराव क्र. ३१० अन्वये भांडेवाडी येथील म.न.पा.च्या मलनि:सारण केंद्राचे २०० द.ल.लि. प्रतिदिन वरून ३०० द.ल.लि. प्रतिदिन पर्यंत क्षमता वाढ करण्यास मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

NTPC च्या मौदा येथील औष्णीक विद्युत केंद्रातील अधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेनुसार व त्यांनी दि. १२.११.२०१८ ला दिलेल्या पत्रान्वये त्यांना १५० द.ल.लि. प्रतिदिन प्रक्रीया केलेले सांडपाणी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये वापरा करीता लागणार आहे.

या करिता भांडेवाडी येथील २०० द.ल.लि. प्रतिदिन क्षमतेच्या प्रक्रीया केंद्राची अस्तित्वात असलेल्या PPP Operator मार्फत क्षमता वाढ करून ३५० द.ल.लि. प्रतिदिन करण्याचा प्रश्न विचारात घेणे व या प्रकल्पाकरीता वाटाघाटी करण्याचा अधिकार मा. आयुक्त यांचेकडे देण्याचा प्रश्न विचारात घेणे. या कामाकरीता निविदा मागविण्याची अट शिथील करावी लागेल.

मा. स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण प्रक्रियेस व रॉयल्टीचे दर ठरविण्याकरीता महानगरपालिकेच्या मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्यात येईल.

टिप : सविस्तर टिपणी नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 561 :— प्रभाग क्र. 5 (क), तुलशीनग उद्यानात पुलाचे व नाल्याच्या भिंतीचे {उद्यान विभाग} बांधकाम अंतर्गत विविध स्थापत्य कामे करण्याच्या प्राकलनास रूपये. 74,82,315/— तसेच या कामास पद क्र. A42101370616 अतंर्गत प्राधान्य देण्यास व या कामाकरीता वास्तूविशारद श्री. त्रिलोक ठाकरे (समाधान ग्रुप) यांना देय असलेल्या मोबदलेचा तसेच वास्तूविषयक सेवा घेण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :—

1. खर्च पद क्र. A42101370616 अंतर्गत वर्ष 2018—19
2. सविस्तर टिप्पणी नस्तीत उपलब्ध आहे.

विषय क्रमांक 562 :— दीनदयाळ अंत्योदय योजना—राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान {समाजकल्याण विभाग} पथविक्रेत्यांना सहाय्य या घटकातंर्गत पथविक्रेत्याचे सर्व्हेक्षण, ओळखपत्र व प्रमाणपत्र देण्यास्तव EOI च्या माध्यमातून संस्था नियुक्त करण्यासाठी संस्थेला करावयाची कार्य ठरविण्याचा प्रश्न विचारात घेणे. याबाबतचा खर्च DAY-NULM योजनेमधून करण्यात येईल.

टिप :— EOI बाबतची सविस्तर टिप्पणी नस्तीत संलग्न.

-----------------